# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

या सारांशाच्या प्रकरणात 'श्रीमती प्रेमलाताई चव्हाण : एक राजकीय नेतृत्त्व' या विषयी मागील प्रकरणात जे मांडण्यात आल आहे त्याचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

१९व्या शतकात भारतात ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाली. त्यामुळे भारतात वैचारिक जागृती घडून आली. या जागृतीतून समाजसुधारकांनी समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा यांना विरोध केला. त्याबरोबरच स्त्रियांवर होणारा अन्याय, जाचक रूढी, बंधने दूर करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये भारतातील अनेक विचारवंतांचा समावेश होतो. राजा राममोहन रॉय यांनी प्रामुख्याने भारतात स्त्री सुधारणेची, समाजसुधारणांची सुरुवात केली. तत्कालीन भारतात समाजपरिवर्तनाच्या कार्यात पुरूषांबरोबर स्त्रियांचाही सक्रीय सहभाग होता. यामध्ये पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, डॉ. रखमाबाई, ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे, तोरू दत्त, स्वर्णकुमारी देवी, कामिनी रॉय, लक्ष्मीबाई टिळक इ. समाजसुधारक स्त्रिया होत. यांच्या पुढाकारामुळे सामाजिक, राजकीय परिवर्तनाला चालना मिळाली. स्वातंत्र्य चळवळीतही स्त्रियांचा सहभाग अधिक होता. यामध्ये राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महल, श्रीमती दुर्गादेवी बोहरा, कल्पना दत्त, विणा दास, प्रितीलता वड्डेदार, सरोजीनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, अवंतिकाबाई गोखले, कमला नेहरू इ. होय. समाजात खऱ्या अर्थाने स्त्री जागृतीचा प्रयत्न या महिलांनी केला.

पहिल्या प्रकरणात 'नेतृत्त्व' ही संकल्पना स्पष्ट केलेली आहे. तत्कालीन भारतीय समाजव्यवस्था पुरूषप्रधान स्वरूपाची होती. अशा स्थितीत स्त्रीनेतृत्त्व कशा पद्धतीने उदयास आली याचे विवेचन केलेले आहे. एखादे स्त्री नेतृत्त्व उदयास येत

असताना तिच्या नेतृत्त्वगुणाबरोबरच सभोवतालची परिस्थिती ही निर्माण होणे आवश्यक असते. तत्कालीन भारतीय राजकीय क्षेत्रात प्रथम महिलांना नेतृत्त्व करण्यासाठी संघर्ष करावा लागला. अशा परिस्थितीत स्त्री नेतृत्त्वाला जर राजकीय पाठींबा मिळाला तर ते नेतृत्त्व समाजात नावारूपाला येत असे.

भारतात प्राचीन काळापासून गंगादेवी, घोषा, जुहू इ. स्त्रियांनी सामाजिक व राजकीय कार्यात पुढाकार घेतला असल्याचे दिसते. १२व्या शतकात सामाजिक, राजकीय क्षेत्राबरोबरच साहित्य क्षेत्रातही महिलांनी प्राविण्य मिळविले. प्राचीन काळातील काही महिलांना योग्य मार्गदर्शन मिळाले त्यामुळे काही महिलाच समाजात पुढे आलेल्या दिसतात.

१७व्या, १८व्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्रियांचे सामाजिक जीवनही समाधानकारक नव्हते. महिलांवर अनेक सामाजिक बंधने होती. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, व्यवस्थेत ज्या स्त्रियांना राजकीय पार्श्वभूमी लाभली अशा महिलांनी नेतृत्व केले. उदा. गोपिकाबाई, येसूबाई, ताराबाई, आनंदीबाई, अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे, प्रेमाबाई कटक,प्रमिलाताई दंडवते, प्रभा राव, विद्यमान राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील इ. महिलांचा सक्रिय सहभाग होता.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महिलांचा पुरूषांबरोबर मोठ्या प्राणात सहभाग होता. याच दरम्यान भारतात राजा राममोहन रॉय यांच्यापासून छ. शाहू महाराजांपर्यंत अनेक समाजसुधारकांनी भारतीय समाजातील अनेक अनिष्ठ रूढी, परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्न केले. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना राजकीय हक्कासाठी संघर्ष करावा लागला नाही. १९१९ च्या मॉटेंग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यानुसार स्त्रियांना

मतदानाचाराजकीय हक्क देण्यात आला. ज्या महिलांना राजकीय वारसा मिळाला केवळ त्या महिलाच राजकीय व्यवस्थेत सहभागी झाल्या असल्याचे दिसते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांना कै. ना. केंद्रीयमंत्री आनंदराव चव्हाण यांचा मोलाचा राजकीय वारसा मिळाला आहे. अशा एकनिष्ठ नेतृत्त्वाची पार्श्वभूमी माहित असणे आवश्यक आहे. म्हणून पहिल्या प्रकरणात त्यांच्या जीवनपटाचा आढावा घेण्यात आलेला आहे. कै.ना. आनंदराव चव्हाण यांनी कराड लोकसभा मतदारसंघातून १९६२,१९६७,१९६९,१९७१ अशा लोकसभा निवडणुका लढविल्या व यशस्वीरीत्या राजकीय कार्ये केली. विविध केंद्रिय मंत्रीपदे उपभोगली. यामध्ये केंद्रिय उपसंरक्षण मंत्री, धान्य व शेती खात्याचे उपमंत्री, नियोजन खात्याचे उपमंत्री, श्रम मंत्रालयाचे उपमंत्री, कायदा व कंपनी खात्याचे उपमंत्री इ. पदावर कार्यरत होते. पश्चिम महाराष्ट्रातील कॉंग्रेसनिष्ठ नेता म्हणून त्यांचा भारतात लौकिक आहे. त्यांचा हा वारसा खा.श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांनी पुढे चालवला.

तत्कालीन भारतीय राजकीय समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते. स्त्रिया समाजात, राजकारणात येणे ही बाब अयोग्य मानली जात असे. अशा प्रतिकूल परिस्थितीत सरोजीनी नायडू, स्वरूपराणी, कस्तुरबा गांधी, कमलादेवी चटोपाध्याय, सुचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडित, श्रीमती इंदिरा गांधी इ. उच्च घराण्यातील महिलांनी सामाजिक, राजकीय कार्यात नेतृत्त्व केले. या महिला नेतृत्त्वामुळे ग्रामीण भागातील सामान्य कुटूंबातील महिलांना चालना मिळाली आणि त्यांही समाजकार्यात सहभागी झाल्या. या नेतृत्त्वामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील एक आदर्श महिला नेतृत्त्व म्हणून खा.श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांना ओळखले जाते. त्यांचा आदर्श पुढे ठेवून ग्रामीण भागातील अनेक स्त्रिया सामाजिक, राजकीय कार्यात कार्यरत आहेत.

पूर्वी कॉंग्रेस पक्षात कोणत्याही मंत्र्याच्या निधनानंतर त्याच्या पत्नीस किंवा महिला नातेवाईकांना राजकारणात संधी दिली जात असे. त्याप्रमाणे केंद्रिय कायदा व कंपनी खात्याचे मंत्री ना. आनंदराव चव्हाण यांच्या निधनानंतर कराड लोकसभा मतदार संघातून श्रीमती प्रेमलाताई यांना लोकसभेत संधी दिली. प्राचीन काळात सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात स्त्री-पुरूष समानता नव्हती. स्त्रीशिक्षणामुळे त्यांच्यात जागृती झाली. त्या राजकीय, सामाजिक कार्यात सहभागी होऊ लागल्या. ज्या स्त्रियांना घरातून राजकीय पाठबळ मिळाले,ज्या उच्च घराण्यातील होत्या केवळ अशाच स्त्रिया राजकीय, सामाजिक कार्यात सहभागी होऊ शकल्या. परंतु ग्रामीण स्त्रियांना यासाठी बराच कालावधी गेला. स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांच्या सहभागामुळे त्यांच्याकडे विधायक दृष्टिकोणातून पाहिले जाऊ लागले. यातून महिला नेतृत्त्वाला प्रोत्साहन मिळाले.

तत्कालीन महाराष्ट्रातून राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षास भरघोस पाठींबा होता. महाराष्ट्र हा कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला समजला जात असे. तत्कालीन महाराष्ट्रातील मा.श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. बाळासाहेब देसाई, श्री. आनंदराव चव्हाण, श्री यशवंतराव मोहिते इ. मान्यवर व्यक्तीनी कॉंग्रेस पक्षास पाठींबा दिला. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक कुटूंबाची कॉंग्रेसनिष्ठा वाखाणण्यासारखी आहे. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कराड लोकसभा मतदार संघातील चव्हाण कुटूंब हे १९६० पासून सद्य परिस्थितीपर्यंत कॉंग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहे. खा.श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचे पती ना. केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांनी १९५२ पासून १९६० पर्यंत शेतकरी कामगार पक्षाचे कार्य केले. पुढे त्यांनी देशहितासाठी १९६० पासून १९७३ पर्यंत राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे अविरत कार्य केले. पक्षकार्याबरोबरच देशकार्य, समाजकार्य केले.

ना. केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांना कोणतेही राजकीय वलय किंवा पाठींबा मिळाला नाही. तरीही नेतृत्व करण्याचे गुण त्यांच्यात होते. त्यामुळे एका

शेतकरी कुटूंबातून नेतृत्व घडले या नेतृत्वाचा थोडक्यात जीवनपरिचय पहिल्या प्रकरणात घेण्यात आलेला आहे मा.कै. आनंदराव चव्हाण यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीचा वारसा श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांना लाभला. पतिनिधनानंतर १९७३ साली खा.श्रीमती प्रेमलताई चव्हाण यांची खऱ्या अर्थाने राजकीय वाटचाल सुरू झाली. खा. श्रीमती प्रेमलाताईंनी ही पक्षनिष्ठा अखेरपर्यंत ठेवली होती. तत्कालीन भारतीय समाजव्यवस्था लक्षात घेता महिलांना राजकीय व्यवस्थेत फारसे प्राधान्य दिले जात नव्हते. अशा स्थितीत ना.कै. आनंदराव चव्हाण यांच्या राजकीय वारसामुळे आणि खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांच्या सामाजिक, राजकीय कार्याचा आढावा व जीवनपरिचय पहिल्या प्रकरणात मांडण्यात आलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणात श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांच्या जीवनपरिचयाचे अवलोकन करण्यात आलेले आहे. तत्कालीन भारतात २५ संस्थाने अस्तित्त्वात होती. या संस्थानामध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांचे बडोदा तर यशवंतराव होळकर, तुकोजी होळकर, अहिल्याबाई होळकर यांचे इंदूर हे संस्थान प्रगतशील होते. खा.श्रीमती प्रेमलाकाकींचे वडील माधवराव जगदाळे हे सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानामध्ये सरदार म्हणून कार्यरत होते. तसेच मातोश्री ताराबाई जगदाळे या महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या साडूची पत्नी होत. त्याबरोबरच खा.श्रीमती प्रेमलाकाकी यांचा जन्म बडोदा शहरात २ जुलै, १९१८ रोजी झाला. त्यामुळे बडोदा संस्थानाबाबतचा इतिहास, येथील परिस्थितीचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे. त्याबरोबरच त्यांचे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षणही बडोदा शहरात झाले. त्यावेळी भारतीय समाजात पडदा पद्धत, घोषा पद्धत अस्तित्त्वात होती. त्यामुळे मुलीना शिक्षण घेताना अनेक अडचणी येत असत. बडोदा संस्थान जरी प्रगतशील असले तरी महिलांच्यावर सामाजिक बंधने होती. साहजिकच प्रेमलाकाकीनी सामाजिक बंधने असूनही आपली शिक्षणाची आवड जोपासली.

मॅट्रीकनंतर सिनिअर केंब्रिजचा अभ्यास त्यांनी इंदूरला आल्यानंतर घरी बसून केला. वडिल जरी शिष्ट स्वभावाचे असले तरी घरचे वातावरण प्रिन्सली स्वरूपाचे होते. प्रेमलाकाकींची शिक्षणाची आवड पाहून त्यांनी सिनिअर केंब्रिजसाठी संमती दिली. शिक्षणाबरोबरच त्यांचे वैवाहिक जीवन, स्वभावगुण, सामाजिक, राजकीय कार्याचा आलेख या प्रकरणात थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. खा.श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांना शिक्षणाबाबत आत्मियता होती. अखंड वाचन, मनन त्या करत असत. श्रीमती प्रेमलाताईनी वि.स. खांडेकर व य.दि. फडके यांच्या लेखनाचे विपूल वाचन केले होते. हिंदी, मराठी, इंग्लिश या भाषेतील साहित्य जाणून घेण्याची त्यांना आवड होती. त्याचबरोबर या तीनही भाषांवरत्यांचे प्रभूत्व होते. खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण या सुशिक्षित मुलाशीच विवाह करणार असा ठाम निर्णय त्यांचा होता. त्याप्रमाणे श्रीमती प्रेमलाताईचे विवाह ना. आनंदराव चव्हाण यांच्याशी २५ एप्रिल, १९४२ रोजी कोल्हापूर येथे नविन राजवाड्यावर महाराणी ताराबाई यांनी करून दिला. माहेर आणि सासर या परस्पर विरोधी परिस्थितीत त्यांनी स्वत:ला सामावून घेतले. स्वत:ला का हवे आहे यापेक्षा कुटुंबियांना काय पाहिजे याचा अधिक विचार प्रेमलाताईनी केला. या स्वभावगुणामुळेच त्यांनी जनसामान्यांसाठी समाजकार्य केले, राजकीय कार्य केले. त्यांच्या कार्याच्या आलेखामुळेच त्यांना संपूर्ण महारत्तष्ट्र 'काकी' या नावाने संबोधतो. भारतीय समाजातील ग्रामीण स्त्रियांचाही विकास व्हावा असे प्रेमलाताईंना मनापासून वाटत होते. या उद्देशाने त्यांनी लोकसभा, राज्यसभेत महिलांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने काही मागण्या केल्या. भारतीय समाजातील महिलांच्या स्थितीविषयक श्रीमती प्रेमलाताईचे मत काय आहे या संदर्भात या प्रकरणात विवेचन केलेले आहे.

खा.श्रीमती प्रेमलाताई चव्हाण : राजकीय वाटचाल या तिसऱ्या प्रकरणात मांडलेला आहे. जरी ना.केंद्रीयमंत्री कै.आनंदराव चव्हाण यांच्या राजकीय जीवन-

कार्यात श्रीमती प्रेमलाकाकींचा राजकीय पाया घातला गेला असला तरी खऱ्या अर्थाने त्यांची राजकीय सुरूवात १९७३ मध्ये झाली. तत्कालीन भारतीय समाजाने महिलांवर अनेक बंधने घातली. अशा सामाजिक परिस्थितीत केवळ पतीचा पाठींबा आणि राजकीय वारसा असल्याने त्यांनी यशस्वीपणे आपली नेतृत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

खा.श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचा गांधी–नेहरू घराण्यावर विश्वास होता. त्याप्रमाणे तत्कालीन भारताचे पंतप्रधान श्रीमती इंदिराजी यांचाही चव्हाण कुटूंबावर विश्वास होता. खा.श्रीमती प्रेमलाकाकींच्या प्रती जिव्हाळा होता. दोघीमध्ये मैत्रीचे संबंध होते. श्रीमती इंदिराजी त्याचबरोबर राजीव गांधी यांनाही अडचणीच्या काळात पाठींबा दिला. मदत केली. गांधी घराण्यातील या व्यक्ती श्रीमती प्रेमलाकाकींना माँ समान मानत असत, त्यांचा आदर करत असत. महाराष्ट्राच्या संदर्भातील कोणत्याही निर्णयात त्यांच्या शब्दाला मान दिला जात असे.

१९७८ मध्ये तत्कालीन महाराष्ट्रातील प्रतिकूल परिस्थितीत आपल्या कराड लोकसभा मतदारसंघात श्रीमती प्रेमलाताईंनी इंदिरा कॉंग्रेसची स्थापना केली. त्यावेळच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीत खऱ्या अर्थाने झालेली ही क्रांतीच म्हणावी लागेल. कोणत्याही परिणामाची तमा न ठेवता त्यांनी इंदिराजींना व इंदिरा कॉंग्रेसला अडचणीच्या काळात खंबीर पाठिंबा दिला. आपल्या पक्षाशी व पक्षनेतृत्त्वाशी त्या एकनिष्ठ राहिल्या. त्यांच्यातील जनप्रेमामुळे, जनसेवेमुळे त्या १९७३ मध्ये कराडसारख्या विस्तीर्ण लोकसभा मतदारसंघातून बिनविरोध निवडून आल्या. भारतात असे दुर्मिळ उदाहरण पहावयास मिळते. त्यांच्या पक्षनिष्ठतेमुळे त्या पश्चिम महाराष्ट्रातील इंदिरा कॉंग्रेसच्या कार्यशील कार्यकर्त्या व महिला नेत्या म्हणून परिचीत होत्या.

प्रकरण पाचवे

तत्कालीन भारतातील महिलांचा सहभाग तसेच तत्कालीन महाराष्ट्रातील महिलांचा राजकीय सहभाग, त्यांची सामाजिक स्थिती याबाबतही तिसऱ्या प्रकरणात विवेचन केले आहे. भारतीय समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जात होते. अशा स्थितीत ज्या महिलांना राजकीय पार्श्वभूमी आहे, राजघराण्याचा वारसा आहे, त्याच पुढे आल्या. यामध्ये ग्रामीण महिलांना फार कमी संधी मिळाली.

खा.श्रीमती प्रेमलाताई यांनाही माहेरचे घराणे राजेशाही स्वरूपाचे होते. त्यांचे वडिल सरदार माधवराव जगदाळे हे महाराज सयाजीराव गायकवाड, यशवंतराव होळकर यांच्या सेवेत कार्यरत होते. याउलट स्थिती सासरची होती. सासरी घरात घोषा पद्धत होती. कुंभारगाव हे पाटण तालुक्यातील गाव त्यांचे सासर पूर्णपणे डोंगराळ भागात वसलेले आहे. त्यामुळे सामाजिक चाली-रीती, बंधने या गावात ही रूढार्थाने चालू होते. अशा ग्रामीण भागातील सामान्य कुटूंबात त्या आल्या. परिस्थितीशी सामावून घेतले. समंजसपणा, संयम, एकनिष्ठता नम्रता हे गुण त्यांच्या अंगी असल्याने दोन परस्पर विरोधी वातावरणात त्या राहिल्या व आपले कार्य केले. सासरचे वातावरण जरी सामान्य असले तरी कुंभारगावामध्ये मा. आनंदराव चव्हाणाचे घर प्रतिष्ठित होते. ना. कै.आनंदराव चव्हाण एलएल्.एम्. होते, कायद्याचे सखोल ज्ञान होते. त्यामुळे प्रेमलाताई सामाजिक, राजकीय कार्य यशस्वीपणे करू शकल्या.

खासदार झाल्यानंतर त्यानी सामान्य जनतेच्या समस्या काय आहेत हे जाणून घेऊन त्यांच्यासाठी कार्य केले. खऱ्या अर्थाने जनसामान्यांचे नेतृत्त्व त्यांनी केले. जनसामान्यांच्या दैनंदिन समस्या, सहकार क्षेत्रातील समस्या, महिलांच्या समस्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसचे पक्षाचे संघटनात्मक बांधणी करण्याचे कार्य त्यांनी केले. तळागाळापर्यंत इंदिरा काँग्रेस पोहचविण्याचे कार्य त्यांनी केले. खा.श्रीमती

प्रकरण पाचवे

प्रेमलाकाकी चव्हाण यांची निवडणूकविषयक चर्चा या प्रकरणात करण्यात आलेली आहे. खा. श्रीमती प्रेमलाकाकीनी १९७३, १९७७, १९८४, १९८९ अशा लोकसभा निवडणुका कराड लोकसभा मतदारसंघातून बहुमताने लढविल्या. त्याचबरोबर १९८० मध्ये राज्यसभेचे प्रतिनिधीत्व केले. १९७८ व १९८० मध्ये महाराष्ट्र प्रांताध्यक्षपद भूषविले. महाराष्ट्रात त्यांनी नवनेतृत्त्वाची निर्मिती करण्याचे नाविन्यपूर्ण कार्य केले. तसेच महाराष्ट्रातून या नवनेतृत्त्वाच्या पाठींब्याची एक फळी निर्माण केली.

खा.श्रीमती प्रेमलाकाकी यांनी इंटरनॅशनल वर्कींग वुमेन्स कमिटी, अखिल भारतीय महिला क्रिकेट संघटना, नॅशनल कॅपेन कमिटी, इंदोर वनिता मंडळ, अखिल भारतीय महिला मंडळ, इंडियन वुमेन्स सर्व्हीस, महाराष्ट्र महिला हँडबॉल संघटना, अखिल भारतीय बिझनेस व प्रोफेशनल विमेन्स असोसिएशन, हॉस्पिटल वेल्फेअर सोसायटी, हिंदी साहित्य संघ, संसदीय शिष्टमंडळ, अखिल भारतीय बौद्ध समाज, राष्ट्रीय सेवा मोर्चा इ. समित्यातून त्यांनी राजकीय योगदान केले. त्यांनी केवळ आपल्या लोकसभा मतदारसंघातच कार्य केले नाही तर संपूर्ण देशासाठी कार्य केले. आपल्या मतदारसंघात त्यांनी विश्वास सहकारी साखर कारखाना, इंदिरा महिला सहकारी साखर कारखाना, हुतात्मा सहकारी साखर कारखाना, आगाशिव सूत गिरण, ओगले काच कारखाना इ. सहकारी संघटनाना मोलाचे सहकार्य केले. त्यांनी स्वत: कराड येथे शिवदर्शन सहकारी साखर कारखाना निर्मितीचा प्रयत्न केला. परंतु यामध्ये त्यांना अपयश आले.

खा.श्रीमती प्रेमलाकाकीनी लोकसभा व राज्यसभेत जनहिताच्या अनेक मागण्या केल्या. यामध्ये नागरी विमानसेवा मागणी, उच्च शिक्षणासाठी अधिक अनुदान मागणी, देशातील साखर समस्या व नविन कारखान्याना परवाने मिळण्याबाबत सरकारकडे मागणी केली. अनुसूचित जाती-जमातींसाठी शिक्षणाची सोय व्हावी अशा योजना सरकारने कराव्यात अशी मागणी त्यांनी लोकसभेत केली.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

भारतातील प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेतीविषयक अनेक समस्या त्यांनी लोकसभेत राज्यसभेत मांडल्या. कृषिविषयक अनेक सुधारणा सरकारने काळजीपूर्वक केल्या पाहिजेत. त्याचबरोबर महिलासंदर्भात अनेक समस्या त्यांनी मांडल्या. खऱ्या अर्थाने सामान्य जनतेचे प्रतिनिधित्व त्यांनी लोकसभेत, राज्यसभेत केले.

प्रकरण चार मध्ये खा.श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांच्या सामाजिक कार्याचे अवलोकन करण्यात आले आहे. भारतीय सामाजिक सुधारणेची सुरूवात राजा राममोहन रॉय यांनी केली. महाराष्ट्रात संत गाडगे महाराज, म.जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाबा आमटे, बाबा आढाव, सिंधुताई सपकाळ इ. समाजसुधारक होऊन गेले. या समाज सुधारकांचा आदर्श पुढे ठेऊन पश्चिम महाराष्ट्रातील खा.श्रीमती प्रेमलाकाकी यांनीही सामाजिक कार्य केले. पती नामदार कै.आनंदराव चव्हाण यांच्या राजकीय कारकिर्दीपासून श्रीमती प्रेमलाकाकीनी सामाजिक कार्यास सुरुवात केली. त्यांनी प्रथम कराडमध्ये मॉन्टेसरीची सुरूवात केली. स्वत: शिक्षण देण्याचे कार्य केले. ग्रामीण भागातील महिलांमध्ये शिक्षणाची जाणीव निर्माण केली. त्यांनी ग्रामीण भागात अनेक ठिकाणी प्राथमिक, माध्यमिक महाविद्यालयाची निर्मिती केली. महिलांच्या सामाजिक विकासासाठी, आर्थिक स्वावलंबनासाठी विविध उद्योजकांना त्यांनी प्रोत्साहन दिले. समाजातील प्रत्येक घटक विकसित झाला पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत होते. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामीण भागात त्यांनी महिला मंडळाची स्थापना केली. सद्यकालीन सरकार ज्या संकल्पनांची अंमलबजावणी करत आहेत अशा महिला बचत गट, महिला मंडळ व महिला संघटन या संकल्पना त्यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेत भारतीय प्रतिनिधित्व करत असताना मांडल्या.

खा.श्रीमती प्रेमलाकाकींनी डोंगरी विकास निधीचे आयोजन केले. पुरग्रस्त समितीचे नेतृत्त्व केले. धरणग्रस्तांच्या समस्या जाणीवपूर्वक सोडविण्याचा प्रयत्न

केला. नवनेतृत्त्वाला संधी दिली. औद्योगिक क्षेत्रात महिलांना प्राधान्य मिळावे यासंदर्भात प्रयत्न केले. खा.श्रीमती प्रेमलाकाकींचा राजकीय कार्याबरोबरच सामाजिक कार्याचा आलेखही मोठा आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय कार्याच्या योगदानामुळे महाराष्ट्रात महिला नेतृत्त्वाचा एक आदर्श निर्माण झाला आहे. त्यांचे नावे प्रत्येक वर्षी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या स्त्रियांना पुरस्कार दिला जातो. डॉ. पतंगराव चव्हाण यांच्या सुविद्य पत्नी विजयमाला कदम आणि कराडच्या नगराध्यक्षा शारदा जाधव यांना ''प्रेमलाताई चव्हाण पुरस्कार'' या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे.

खा.श्रीमती प्रेमलाकाकीनी राज्यसभेत, लोकसभेत महिलांविषयक समस्या, त्यांच्या सुधारणाविषयक मागण्या, शिक्षण समस्या सोडविण्याचा प्रयत्न, इतर सामाजिक, राजकीय समस्या सोडविण्याचा प्रयत्न खासदार असताना श्रीमती प्रेमलाकाकी यांनी केला. अखिल भारतीय संस्थाचे, समित्यांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले, त्यांना सहकार्य केले. दिल्लीतील मूक व बधिर संस्था नावारूपाला आणली. या समित्यातून त्यांनी सामाजिक कार्य केले. पश्चिम महाराष्ट्रातील हे एक धडाडीचे महिला नेतृत्त्व ग्रामीण महिलांना ही आदर्शवत ठरलेले आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील पक्षनिष्ठ, नेतृत्त्वनिष्ठ असणाऱ्या घराण्यापैकी चव्हाण घराणे हे एक आहे. कै.ना. आनंदराव चव्हाण यांनी १९६० ते १९७३ पर्यंत कॉंग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहून देशकार्य, जनसेवा केली. पती निधनानंतर श्रीमती प्रेमलाकाकी यांनी त्यांच्या कार्याचा वारसा १९७३ ते १९९१ पर्यंत अविरत चालवला. महाराष्ट्राच्या राजकीय स्थितीत आपला वचक निर्माण केला. जनसेवा केली. अतिशय स्पष्ट वक्तेपणा, तत्त्वनिष्ठता, नम्रता, एकनिष्ठता, संयमी असे गुण त्यांच्याकडे असल्याने ते एक आदर्श महिला नेतृत्त्व म्हणून महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात त्यांची प्रतिमा साकार झाली. त्यांच्या आदर्श नेतृत्त्वामुळे महिलांना राजकीय, सामाजिक कार्य

करण्यास प्रेरणा मिळाली. खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण या महाराष्ट्रातील महिलांसाठी आणि नवनेतृत्त्वासाठी आदर्श स्थानी आहेत. त्याचबरोबर तत्कालीन भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्नेही, एकनिष्ठ, पक्षनिष्ठ, नेतृत्त्व म्हणून संपूर्ण भारतात त्यांनी नावलौकिक मिळविला. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्र त्यांना 'काकी' या नावाने ओळखतो. अशा स्वरूपाचे महिला नेतृत्व समाजात पुन्हा - पुन्हा साकार व्हावीत अशी प्रेरणा खा.श्रीमती प्रेमलताई चव्हाण यांच्या नेतृत्वातून मिळते.

-----